१९१९-२०१३

आपल्या वैशिष्ट्यपूर्ण आवाजाने रसिकांवर अधिराज्य गाजवणाऱ्या पार्श्वगायिका शमशाद बेगम यांचे मंगळवारी (दि. २३) निधन झाले. संगीताच्या सुवर्णयुगात ज्या गायकांनी आपला खास ठसा उमटवला, त्यापैकी शमशाद बेगम एक. त्यांच्या आठवणींना उजाळा देत वाहिलेली ही श्रद्धांजली....

# नैना भर आये नीर...

शमशाद बेगम यांच्या निधनामुळे रसिकांची अवस्था 'नैना भर आये नीर' अशी झाली आहे. 'दीदार' या चित्रपटात 'नैना भर आये नीर' हे गाणे शमशाद बेगम यांनीच गायले होते. शमशाद बेगम यांचा जन्म १४ एप्रिल १९१९रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. लहानपणापासून त्यांना गाण्याची आवड होती. १९३३ सालापासून त्यांनी गायन क्षेत्रात पदार्पण केले. मात्र, चित्रपटसृष्टीत पार्श्वगायन करण्याची पहिली संधी त्यांना १९४१मध्ये 'खजांची'च्या माध्यमातून मिळाली. १९४७मध्ये पेशावर रेडिओ केंद्रावरून त्यांनी गायलेले गाणे प्रेक्षकांच्या मनात घर करून बसले. भारताची फाळणी होऊन पाकिस्तान निर्माण झाला. मात्र, शमशाद बेगम यांच्या आवाजाला या दोन्ही देशांच्या सरहद्दीचे कुंपण कधीच आडवे आले नाही. त्या दोन्ही देशांत विलक्षण लोकप्रिय होत्या. त्यांच्या गायनातील नजाकतीने श्रोत्यांचे मन मोहून घेतले. के. एल. सैगल यांच्या शमशाद बेगम निस्सीम चाहत्या होत्या. त्यामुळे सैगलची भूमिका असलेला 'देवदास' चित्रपट त्यांनी तब्बल १४ वेळा पाहिला होता. आपल्या गायन कारकीर्दीच्या प्रारंभी शमशाद बेगम यांना प्रत्येक गाण्यामागे १५ रु. मोबदला मिळत असे. गायिका म्हणून त्यांची लोकप्रियता जशी वृद्धिंगत होऊ लागली, तशी क्झेनेफोन या त्या काळच्या म्युझिक कंपनीने काढलेल्या रेकॉर्डचा तब्बल ५ हजार रुपयांचा मोबदला मिळाला होता. दिल्लीच्या ऑल इंडिया केंद्रावरूनही त्या नियमितपणे गात असत. चित्रपटांमध्ये आपण कधीही काम करणार नाही, असे वचन त्यांनी आपल्या वडिलांना दिले होते. त्यामुळे चित्रपटात कॅमेऱ्यासमोरच्या शमशाद बेगम प्रेक्षकांना कधीच पाहता आल्या नाहीत. मात्र, चित्रपटासाठी पार्श्वगायन करून त्यांनी अवघ्या रसिकांना भरभरून आनंद दिला. शमशाद बेगम यांची पार्श्वगायन कारकीर्द खूप प्रदीर्घ आहे. मात्र, या काळात कोणत्याही मासिकामध्ये किंवा प्रकाशनामध्ये त्यांची छायाचित्रे अभावानेच झळकली असतील. १९७०पर्यंत तर अशी अवस्था होती की, सर्वसामान्य प्रेक्षकांना शमशाद बेगम या चेहऱ्याने फारशा परिचित नव्हत्या. त्यांचा आवाज हीच मुख्य ओळख रसिकांच्या मनात रुजली होती. शमशाद बेगम यांच्या आवाजातील गहिऱ्या नजाकतीचा पार्श्वगायनासाठी पुरेपूर उपयोग मुख्यत्वे नौशाद अली, ओ. पी. नय्यर या महान संगीतकारांनी करून घेतला. १९४० ते १९६० व १९७०च्या दशकाचा प्रारंभ या काळात शमशाद बेगम यांनी अनेक अजरामर गाणी गायली. संगीताचे कोणतेही औपचारिक शिक्षण न घेता केवळ निसर्गदत्त आवाज व मेहनती स्वभाव यांच्या बळावर शमशाद बेगम या पार्श्वगायनात यशाच्या शिखरावर पोहोचल्या होत्या.

शमशाद बेगम यांचा आवाज एकदम दाणेदार होता. त्या आवाजाने त्या काळचे प्रख्यात सारंगीवादक उस्ताद हुसैन बक्षवाले यांचे शमशाद यांच्याकडे वेधले गेले. मूळचे लाहोरचे असलेले संगीतकार गुलाम हैदर यांनी खजांची (१९४१), खानदान (१९४२) यांसारख्या आपल्या सुरुवातीच्या काही चित्रपटांत शमशाद बेगम यांच्याकडून अप्रतिम गाणी गाऊन घेतली. त्यानंतर १९४४ मध्ये गुलाम हैदर हे लाहोरहून मुंबईला आले. त्यांच्याबरोबर पार्श्वगायनातील संधी शोधण्यासाठी शमशाद बेगमही मुंबईला आल्या. सी. रामचंद्र यांनी संगीतबद्ध केलेले 'मेरी जान ...संडे के संडे' हे पाश्चात्त्य शैलीचे शमशाद बेगम यांनी गायलेले गाणे रसिकांनी डोक्यावर घेतले होते. १९४०च्या दशकाच्या अखेरीस नौशाद अली या संगीतकाराने शमशाद बेगम यांच्याकडून उत्तम गाणी गाऊन घेतली. हा सिलसिला १९५०चे पूर्ण दशक व १९६०च्या दशकाच्या प्रारंभीपर्यंत सुरू राहिला. नौशाद अली यांचे संगीत व शमशाद बेगम यांच्या आवाजातील दिलबहार गाणी हे अतूट समीकरण बनले ते याच काळात. मंदिरातील घंटानादासारखा शमशाद बेगम यांचा आवाज आहे, असे प्रख्यात संगीतकार ओ. पी. नय्यर म्हणत असत. १९४० ते १९६०च्या दशकाच्या प्रारंभीपर्यंत शमशाद बेगम पार्श्वगायन क्षेत्रात अव्वल स्थानी होत्या.



### शमशाद बेगम गाजलेली काही गाणी

- ले के पहला पहला प्यार (चित्रपट - सीआयडी)
- मिलते ही आँखे दिल हुआ दिवाना किसीका (बाबुल)
- चली चली कैसे ये हवा ये (ब्लफमास्टर)
- कभी आर कभी पार लगती रे नजर (आर पार)
- ओ गाडीवाले धीरे (मदर इंडिया)
- कहीं पे निगाहे कहीं पे निशाना (सीआयडी)
- बुझ मेरा क्या नाम रे, मेरे पिया गये रंगून (पतंगा)
- एक तेरा सहारा (शमा)
- नैना भर आये नीर (दीदार),
- नजर फेरो ना हमसे (दीदार)
- छोड बाबुल का घर (बाबुल)
- कजरा मोहब्बतवाला अखियोंमे ऐसा डाला (किस्मत)
- मेरी निंदो मे तुम, मेरी ख्वाबों मे तुम (नया अंदाज)
- मेरी महफिल मे किस्मत (मुघल-ए-आझम)
- रेशमी सलवार कुर्ता जाली दा (नया दौर)
- मिलते है आँखे दिल दिवाना हुँआ किसीका (बाबुल)
- धरती को आकाश पुकारे (मेला)
- होली आये रे कन्हाई (मदर इंडिया)
- दो तीन आजा मौसम है रंगीन (आवारा).

# ठसकेबाज आवाजाची बेगम

अजय कुलकर्णी

वीस - पंचवीस वर्षांपूर्वी आम्ही सकाळी शाळेला निघालो की टपऱ्यांवर सुरू असलेल्या रेडिओ सिलोनवरून 'मेरे पिया गये रंगून' हे गाणे हमखास कानी पडायचे. हे गाणे आजही लक्षात आहे, ते त्यातील ठसकेबाज आवाजामुळे. हा आवाज शमशाद बेगम यांचा. 'मेरे पिया...'सारख्या अवीट गोडीच्या अनेक गाण्यांचे शमशाद बेगम यांच्या आवाजाने सोने केले आहे. स्फटिकाप्रमाणे नितळ असणाऱ्या शमशाद यांच्या आवाजाचे गारूड आजच्या तरुणाईवरही आहे. म्हणूनच त्यांनी गायलेले 'ले के पहला पहला प्यार' तरुणाईला पुन्हा पुन्हा ऐकावेसे वाटते.

महिलांनी उंबरठ्याबाहेर पाय ठेवल्यास डोळे वटारले जाण्याच्या काळात शमशाद यांनी आपल्या आवाजाने सर्वांचे लक्ष वेधले. प्रारंभीच्या काळात पेशावर रेडिओ स्टेशनवर काम पाहिलेल्या शमशाद यांच्या आवाजातील जादू ओळखली ती, सारंगी वादक उस्ताद हुसेन बक्षवाले साहेब यांनी. त्यांनी शमशाद यांच्या आवाजाला शिस्त लावली. त्यानंतर शमशाद यांच्या गळ्यातून बाहेर पडलेल्या सुरांनी रसिकांना मोहिनी घातली. सी. रामचंद्र, नौशाद आणि ओ. पी.नय्यर या संगीतकारांनी शमशाद यांच्या आवाजाची रेंज ओळखत अनेक गाणी त्यांना दिली. शमशाद यांनी त्या गाण्यांचे सोने केले हे वेगळे सांगावयास नको.

'खजांची' हा शमशाद बेगम यांचा पार्श्वगायिका म्हणून पहिला चित्रपट. गुलाम हैदर यांनी शमशाद यांच्या आवाजाचा योग्य वापर करत ही गायिका जगासमोर आणली. 'मदर इंडिया'मधील शमशाद यांच्या गाण्यांना मोठा रसिकाश्रय लाभला. यातील 'ओ गाडीवाले धीरे'... असा टिपेचा स्वर आजही कानात गुंजतो तसाच 'होली आयी रे'...मधून कानांना वेगळा आनंद देतो, ही सारी शमशाद यांच्या आवाजाची जादू! सी. रामचंद्र यांनीही शमशाद यांना अनेक चांगली गाणी दिली. 'पतंगा'मधील 'मेरे पिया गये रंगून किया है...' हे गाणे आजही अनेकांच्या हृदयात वेगळ्या स्थानी आहे. 'मेरी जान, संडे के संडे' गाण्यातून पाश्चात्त्य शैलीची गाणी आपल्या आवाजाने कशी खुलवावीत याचा सुंदर नमुना शमशाद बेगम यांनी सादर केला.

शमशाद यांचे खरे सूर जुळले ते संगीतकार ओ. पी. नय्यर यांच्याबरोबर. ओ.पीं.चा तो सुप्रसिद्ध पंजाबी ठेका आणि त्याला शमशाद यांच्या ठसकेबाज आवाजाची साथ..यातूनच जन्माला आली न विसरता येणारी अवीट गोडीची अनेक अविस्मरणीय गाणी! या समीकरणाची पहिली झलक मिळाली ती 'ले के पहला पहला प्यार' (सीआयडी)मधून. नंतर 'कभी आर कभी पार' (आरपार) मधला 'तीर' खरोखरच घायाळ करणारा होता. 'कहीं पे निगाहे कही पे निशाना' (सीआयडी) मधील त्या 'बेगम'मय ठसक्याला आजही तोड नाहीच. 'बुझ मेरा क्या नाम रे...'मधून आपल्याला नकळत केव्हा गावाकडे नेले हे कळलेच नाही. त्यानंतर आशासह गायलेल्या 'कजरा मोहब्बतवाला'ने (किस्मत) रसिकांची जान घेतली. 'मेरे निंदों में तुम'.. (नया अंदाज) मध्ये किशोरकुमार यांच्यासह शमशाद यांचा आवाज ऐकणे म्हणजे निव्वळ अविस्मरणीय अनुभवच! ओपी आणि शमशाद यांची गाण्यांना आजही यू-ट्यूबवर सर्वाधिक हिट का मिळतात याचे प्रत्यंतर ही गाणी ऐकल्यानंतर येते.

नौशाद यांनीही शमशाद यांच्या आवाजाचा समर्पक वापर अनेक गाण्यांतून केला आहे. 'छोड बाबुल का घर', 'किसीके दिल में रहना था', 'मिलते ही आँखे दिल हुआ' (बाबुल), 'ओ गाडीवाले' आणि 'होली आयी रे' (मदर इंडिया ) ही त्याची काही उदाहरणे. 'तेरी महफिल में'(मुगल-ए-आझम) गाण्यांत लताबरोबरची शमशाद यांची जुगलबंदी अशी काही रंगली आहे की ते गाणे अनेक वेळा ऐकल्यानंतरही त्याची गोडी यत्किंचितही कमी होत नाही. शमशाद यांच्या अनेक गाण्यांबाबत हीच स्थिती आहे. 'नया दौर'मधील त्यांचे आशाताईंसोबतचे 'रेशमी सलवार...' हे गाणे ऐका म्हणजे त्याचे पुन्हा एकदा प्रत्यंतर येईल. कारण तो ठसकेबाज आवाजच त्या तोडीचा आहे.

■ kajaykulkarni@gmail.com



आपल्या वैशिष्टयपूर्ण आवाजाने सर्वांना मोहिनी घालणाऱ्या गायिका शमशद बेगम यांना २००९ मध्ये पद्मभूषण पुरस्कार राष्ट्रपती प्रतीभाबाई पाटील यांच्या हस्ते देण्यात आला. तेव्हाचे छायाचित्र.

### ठेका व ठसक्याचे अजब समीकरण

उंचीवर पोहोचणारा पहाडी आवाज हे शमशद बेगम यांच्या गायकीचे आगळे वैशिष्ट्य. या आवाजातील गोडवा आणि ठसका याला जोड मिळाली ती त्या काळातील प्रतिभावान संगीतकारांच्या सुमधुर ठेक्याची. त्यातूनच त्यांची अजरामर गीते लोकप्रिय झाली.

## शमशाद बेगम यांना मान्यवरांची श्रद्धांजली

### हसतमुख कलाकार गेला
लता मंगेशकर. गानसम्राज्ञी

आज सकाळी मला कळाले की, प्रसिद्ध गायिका शमशाद बेगम आपल्यातून निघून गेल्या. हे ऐकून अतीव दुःख झाले. मी त्यांच्यासोबत अनेक गाणी गायिली आहेत. त्या नेहमी हसतमुख असत. त्यांना माझी मनःपूर्वक श्रद्धांजली.

### सोनेरी आवाजाची राणी
अमिताभ बच्चन. अभिनेता

शमशाद बेगम यांच्या सोनेरी आवाजाने अनेक चित्रपटांना दर्जेदार गाणी दिली. मात्र, आता हा आवाज शांत झाला आहे. शमशादजींच्या जाण्याने खूप दुःख होत आहे. शमशाद बेगमजींना माझी भावपूर्ण श्रद्धांजली.

### सुवर्ण युगातील पार्श्वगायिका
बप्पी लाहिरी.संगीतकार, गायक

यंदा भारतीय चित्रपटसृष्टी शताब्दी वर्ष साजरे करत असतानाच शमशादजी आपल्यातून निघून गेल्या. जुन्या काळातील त्या एकमेव उत्तम हिंदी पार्श्वगायिका होत्या. त्यांची अनेक गाणी आजही ऐकली जातात.

### स्मरणात राहणारा आवाज
शंकर महादेवन.संगीतकार, गायक

शमशादजींचा आवाज कायम आपल्या स्मरणात राहील. चार वर्षांपूर्वी त्यांच्याशी माझे बोलणे झाले होते. त्या वेळी त्यांनी मला अशीर्वाद दिले होते. त्यांचे ते आशीर्वादरूपी वाक्य आजही माझ्या स्मरणात आहे. त्यांच्या गायकीला तोड नाही.

### जुन्या पिढीतील दर्जेदार गायिका
मधुर भांडारकर.दिग्दर्शक

शमशाद बेगम खऱ्या अर्थाने भारताच्या जुन्या पिढीतील दर्जेदार गायिका होत्या. त्यांच्या जादुई आवाजातील गाण्यांनी अनेकांना वेड लावले होते. त्यांच्या जाण्याने चित्रपटसृष्टीची मोठी हानी झाली. त्यांची गाणी दीर्घकाळ स्मृतीत राहतील.

## व्यापार



कॉलम ऑन स्टॉक्स
■ विपुल वर्मा

# बाजारात तेजी येण्याचे संकेत

घाऊक महागाईचा दर मार्चमध्ये विश्लेषकांच्या अपेक्षेपेक्षा जास्त प्रमाणात घटून ५.९६ टक्क्यांवर आला. यामुळे येत्या ३ मे रोजी जाहीर होणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणात व्याजदर कपातीची शक्यता वाढली आहे. आर्थिक विकासाची गती वाढवण्यासाठी प्रमुख व्याजदरात ०.२५ टक्के कपात गरजेची आहे. बहुतेक कंपन्यांचे आर्थिक तिमाही निकाल अपेक्षेप्रमाणे आहेत. आर्थिक सुधारणांच्या अपेक्षेने शेअर बाजारात उत्साह दिसत आहे.

सोने, चांदी आणि कच्च्या तेलाच्या किमतींतील घसरणीमुळे बाजारातील वातावरण सकारात्मक होण्यास चांगली मदत झाली. यातील घसरणीचा कल दोन आठवड्यांपासून सुरू आहे. या तीन कमोडिटीच्या जास्त आयातीमुळे देशाच्या चालू खात्यावरील वित्तीय तूट वाढत आहे. अशा स्थितीत यातील घसरणीमुळे तूट कमी होण्यास मदत होणार आहे. एकंदरीत देशातील शेअर बाजारात सतर्कतेचे वातावरण आहे. आता रिझर्व्ह बँकेच्या पतधोरणाकडे बाजाराचे लक्ष लागले आहे. आरबीआयने व्याजदरात कपात केली तर बाजारात तेजी दिसून येईल.

मात्र, एक बाब लक्षात घ्यायला हवी की, पाव टक्का व्याजदर कपात बाजाराने आधीच गृहित धरली आहे. यामुळे बँकिंग इंडेक्समध्ये तेजीही आली आहे. त्यामुळे पाव टक्का व्याजदर कपातीने बाजारात ट्रिगर रॅली ठरू नये. मात्र, अर्धा टक्का व्याजदर कपात झाल्यास बाजार उसळी घेण्याची शक्यता आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर या आठवड्यात उल्लेखनीय असे काही नाही. चीन अर्थव्यवस्थेने काहीअंशी मंदीचे संकेत दिले आहेत. त्यामुळे जगभरातील बाजार चीनकडून संकेताची प्रतीक्षा करतील. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेकडून नरम, परंतु सकारात्मक संकेत आहेत. या आठवड्यात अमेरिकेच्या हाउसिंग क्षेत्राच्या आकडेवारीकडे लक्ष राहील.

देशातील शेअर बाजारात चांगली तेजी आहे. अशा स्थिती बाजार कन्सॉलिडेट होईल किंवा काही करेक्शन दाखवेल. निफ्टीला ५८७२ वर चांगला अडथळा आहे. मात्र, ही पातळी पार केल्यास पुढील अडथळा ५९१२ वर मिळेल. नंतर निफ्टीला ५९४८ मजबूत अडथळा होईल. सध्या निफ्टीत तेजी येण्याची शक्यता नाही.

खालच्या दिशेने निफ्टीला ५७९१ वर महत्त्वाचा आधार आहे. हा स्तर तुटल्यास पुढील आधार ५७४३ वर मिळेल. हा निफ्टीसाठी चांगला आधार आहे. मात्र, व्हॅल्युमसह या पातळीवर मोठ्याप्रमाणात विक्रीचा दबाव राहिला तर पुढील आधार ५६८१ वर मिळेल. सध्याच्या परिस्थितीत हा निफ्टीसाठी तगडा आधार ठरू शकतो.

शेअर्सच्या बाबतीत या आठवड्याच डिश टीव्ही लिमिटेड, एलआयसी हाउसिंग फायनान्स लिमिटेड आणि टेक महिंद्रा लिमिटेड चार्टवर उत्तम दिसताहेत. डिश टीव्हीचा मागील बंद भाव ६८.४५ रुपये आहे. त्याचे पुढील टार्गेट ७२ रुपये आणि स्टॉप लॉस ६५ रुपये आहे. एलआयसी हाउसिंग फायनान्सचा मागील बंद भाव २३२.२५ रुपये आहे. त्याचे पुढील टार्गेट २३८ रुपये आणि स्टॉप लॉस २२६ रुपये आहे, तर टेक महिंद्राचा मागील बंद भाव ९२४.१० रुपये आहे. त्याचे पुढील टार्गेट ९३७ रुपये आणि स्टॉप लॉस ९११ रुपये आहे.

**लेखक तांत्रिक विश्लेषक व** money-vistas.com **सीईओ आहेत.**

vipul.verma@dainikbhaskargroup.com

### एनर्जी ड्रिंक्ससाठी...



मुंबईत बुधवारी आयोजित एका कार्यक्रमात अभिनेत्री सोनाली सेहगल, सनी लिओन, आयपीएलची अँकर अर्चना विजयासह अभिनेता सचिन जोशी यांनी एनर्जी ड्रिंक सादर केले.

नवी पावले | ८ टक्के विकास दरासाठी प्रयत्न करू

# आर्थिक सुधारणांना आणखी गती देणार

### रखडलेल्या विधेयकांना संमतीसाठी विरोधकांना आवाहन-पी. चिदंबरम

### रेल्वे, रस्ते, कोळसा क्षेत्रातील मरगळ हटवण्यासाठी लवकरच योजना

वृत्तसंस्था | नवी दिल्ली

आर्थिक सुधारणा कार्यक्रम राबवणे हे यूपीए सरकारचे वचन असून येत्या दोन ते चार महिन्यांत या सुधारणांना गती देऊ, असे मत केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी व्यक्त केले. संसदेत पटलावर असणारी विधेयके संमत करण्यासाठी विरोधी पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. मुदतपूर्व निवडणुकांची शक्यता फेटाळताना आणखी १३ महिने हातात असल्याचे त्यांनी सांगितले.

या १३ महिन्यांत योग्य ती पावले उचलताना देशाचा आर्थिक विकास ८ टक्के राहील याची काळजी घेऊ , असे अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केले. ते म्हणाले, आणखी बरेच काही करणे अजून बाकी आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला गती येण्यासाठी सतत आर्थिक सुधारणा करण्यावर सरकारचा भर राहील. इंग्लंडस्थित 'द इकॉनॉमिस्ट' या मासिकातर्फे आयोजित कार्यक्रमात चिदंबरम यांनी विविध विषयांवर भाष्य केले. ते म्हणाले, नेमके काय करायचे याची यादी तयार आहे. विमा विधेयक, भूमी अधिग्रहण विधेयक अशी विधेयके संमत करून घेणे आवश्यक आहे. विमा क्षेत्रात ४९ टक्के थेट विदेशी गुंतवणुकीला परवानगी रखडली आहे. ती कार्यान्वित करणे गरजेचे आहे. कोळसा, रस्ते व रेल्वे आदी क्षेत्रांतील सुधारणांना गती देण्यासाठी पावले उचलण्यात येतील.

### जीएसटीसाठी सहकार्य हवे



माल आणि सेवा कर (जीएसटी) विधेयक संसदेच्या पटलावर आहे. ते संमत होण्यासाठी विरोधी पक्षांनी सहकार्य करण्याची अपेक्षा आहे. गुंतवणुकीबाबत असलेल्या कॅबिनेट समितीने अलीकडेच उचललेल्या पावलांमुळे आर्थिक वाढीला चालना मिळाली आहे. त्यामुळे रोजगारनिर्मिती झाली आहे.

## सोन्यातील घसरणीचा कर्जावर परिणाम नाही

### असोसिएशन ऑफ गोल्ड लोन कंपनीज संस्थेचे मत

प्रतिनिधी | मुंबई

सध्या सोन्याच्या भावात झालेल्या घसरणीच्या पार्श्वभूमीवर देशातील सुवर्ण कर्ज देणाऱ्या कंपन्यांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या असोसिएशन ऑफ गोल्ड लोन कंपनीज या संस्थेने सुवर्ण कर्जाचा कमाल व्याजदर कमी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रतिग्रॅम सोन्यावर दिलेल्या रकमेत घट झालेली असली तरी सोन्यावरील कर्जाला मोठी मागणी आहे. परंतु सोन्याच्या किमतीत १५ ते २० टक्के चढ-उतार झाला तरी त्याचा सुवर्ण कंपन्यांच्या व्यवसायावर तसेच कर्जदाराच्या परतफेडीवर परिणाम होऊ शकतो असा गैरसमज करू नये, असे मत या संस्थेने व्यक्त केले आहे.

सुवर्ण कर्ज कंपन्या बहुतांश कर्जे घरातील सोन्याच्या दागिन्यांवर देतात आणि त्यावर अशा तात्पुरत्या चढ-उताराचा व्यवसायावर होणारा परिणाम अल्प कालावधीसाठी असतो. त्याचप्रमाणे कर्ज वितरणाच्या तुलनेत अनुत्पादित कर्जाचे प्रमाण कमी असते, असे मत असोसिएशनचे अध्यक्ष आणि मुथूट फायनान्सचे व्यवस्थापकीय संचालक जॉर्ज अलेक्झांडर मुथूट यांनी व्यक्त केले.

# जेटला शेअर्स विक्रीस मंजुरी

वृत्तसंस्था | नवी दिल्ली

एतियाद एअरवेजला शेअर्स विक्री करण्यासाठी जेट एअरवेजला कार्यकारी मंडळाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे जेट २७.२६ दशलक्ष समभाग एतियादला विकता येतील. या समभागांची किमत ७५४.७३ रुपये निश्चित करण्यात आली आहे. एतियादला विक्री करण्यात येणाऱ्या जेट एअरवेजच्या शेअर्सचे प्रमाण ३२ टक्के आहे. जेट एअरवेजच्या कार्यकारी मंडळाच्या बुधवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय झाला.

## टी टाइम

मीनाक्षी कुलकर्णी
क्रमांक ५६०

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | ४ | ■ | ५ | ६ | | ■ |
| ७ | | ८ | ■ | | ■ | ९ | | ■ | १० |
| | ■ | ११ | | ■ | १२ | | | ■ | |
| ■ | १३ | | ■ | १४ | | ■ | १५ | | |
| १६ | | | ■ | | ■ | १७ | | ■ | ■ |
| १८ | | ■ | १९ | | | | ■ | २० | |
| | ■ | २१ | | ■ | ■ | २२ | २३ | | ■ |
| | ■ | २४ | | २५ | ■ | २६ | | | २७ |
| २८ | २९ | ■ | ३० | | ३१ | ■ | | ■ | |
| ३२ | | ■ | | ■ | ३३ | | ■ | ३४ | |

**आडवे शब्द**
१. अंगठा, सोटा
३. हमी, ग्वाही
५. अयोग्य
७. आरडाओरड
९. वेल
११. शासन, शिक्षा
१२. एक ग्रह
१३. अब्रू, इज्जत
१४. झाडांची पाने
१५. कार्यपद्धती
१६. आवश्यकता
१७. शाश्वती, हमी
१८. शाई
१९. संस्था
२०. माज, गुर्मी
२१. घरगडी
२२. लढाई, चुरस
२४. निष्णात, मर्मज्ञ
२६. गब्बर
२८. पौष महिना
३०. उद्यानंतर
३२. जोरदार ठोसा
३३. संन्यास
३४. कोळीष्टक

**उभे शब्द**
१. खुजा, टिल्लू
२. कपोल
४. माड
५. निराळा, भिन्न
६. कपटी, कारस्थानी
८. कल्पित कथा
१०. चूळ
१२. प्रधान
१३. मुलीचे एक नाव
१४. वाणी
१६. स्टील सिटी
१७. स्वयंपाकी
१९. अधिकारपत्र
२०. बहरीनची राजधानी
२१. नृप, भूपती
२३. पाकिस्तानातील शूर मुलगी
२५. तंतू
२७. दर्भासारखे गवत
२९. जुगार
३१. चामड्याची अरुंद पट्टी

क्रमांक ५५९ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प | रि | व | ह | न | ■ | ना | य | ना | ट |
| रि | ■ | च | ल | न | ■ | क | व | न | ■ |
| श्र | मि | क | ■ | ■ | जा | मु | न | ■ | गु |
| म | ती | ■ | उ | ब | दा | र | ■ | मा | ज |
| ■ | ■ | ना | ■ | हा | ■ | ड | ■ | धु | रा |
| दी | ड | श | हा | णा | ■ | णे | ■ | री | ण |
| प | ल्ला | ■ | त | ■ | ग | ■ | धु | ■ | ■ |
| स्तं | ■ | नि | च | रा | ■ | अ | व | ता | र |
| भ | ■ | ब | ला | ■ | अ | क्ष | ता | ■ | म |
| ■ | पा | र | खी | ■ | ड्डा | ■ | रा | व | ण |